मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल


बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# यंदा 22 हजार मालमत्ताधारकांचा मालमत्ताकर माफ; महापालिकेचा निर्णय

## शास्तीकर माफीअंतर्गत 164 कोटी रूपयांचे समायोजन होणार; आतापर्यंत 96 कोटी रूपयांचा लाभ

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील २०२३ पूर्वी झालेल्या अनधिकृत बांधकामांना लावण्यात आलेला शास्तीकर राज्य सरकारने माफ केल्यानंतर आतापर्यंत ९६ कोटी १२ लाख रूपयांचे समायोजन केले आहे. २०२६-२७ या वर्षात २२ हजार ९०६ मालमत्ता धारकांच्या रक्कमेचेही मालमत्ता करामध्ये समायोजन करण्यास बुधवारी (दि.१०) स्थायी समितीने मान्यता दिली आहे.



पिंपरी-चिंचवड शहरातील अनधिकृत बांधकामांना २०१२-१३ पासून शास्तीकर वसूल केला जात होता. ३ मार्च २०२३ रोजी राज्य शासनाने शहरातील अनधिकृत बांधकामांचा शास्तीकर माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार ३ मार्च २०२३ पूर्वी झालेल्या २५ हजार ६७३ अनधिकृत बांधकामांना याचा लाभ मिळाला. या मालमत्ता धारकांनी शास्तीकराची २६० कोटी ५३ लाख रूपयांची रक्कम महापालिकेकडे जमा केली होती.

शास्ती कर माफीचा निर्णय झाल्यानंतर २०२३-२४ मध्ये २२ हजार ५१२ मालमत्ता धारकांना ३० कोटी ३ लाख, २०२४-२५ मध्ये २५ हजार ६७३ मालमत्ता धारकांना ३५ कोटी ९५ लाख, २०२५-२६ मध्ये २१ हजार ८२४ मालमत्ता धारकांना ३० कोटी १४ लाख असे ९६ कोटी १२ लाख रूपयांची रक्कम मालमत्ता करामध्ये समायोजित केली. त्यानंतरही २२ हजार ९०६ मालमत्ता धारकांची १६४ कोटी ४१ लाख रूपयांची रक्कम मालमत्ता करामध्ये समायोजित करणे बाकी आहे. त्यानुसार २०२६-२७ या आर्थिक वर्षात १६४ कोटी ४१ लाखांपैकी जेवढी शक्य आहे, त्यानुसार ती रक्कम समायोजित केली जाणार आहे. या समायोजनाला स्थायी समितीने बुधवारी मान्यता दिल्याची माहिती कर आकारणी व कर संकलन विभागाचे उपायुक्त सचिन पवार यांनी दिली.

> “ शहरातील २५ हजार ६७३ मालमत्ता धारकांनी प्रामाणिकपणे शास्तीकर भरून मालमत्ता कर महापालिकेकडे जमा केला होता. राज्य सरकारने २०२३ मध्ये शास्तीकर माफीचा निर्णय घेतला. त्यामुळे शास्तीकर भरलेल्या नागरिकांची रक्कम २०२३-२४ पासून त्यांच्या मालमत्ता करातून समायोजित केली जात आहे. आतापर्यंत २६० कोटी ५३ लाखापैकी ९६ कोटी १२ लाख रूपये समायोजन केले आहे. चालू आर्थिक वर्षात २२ हजार ९०६ मालमत्ता धारकांनी कर भरू नये. त्यांची आगाऊ भरलेली रक्कम मालमत्ता करात समायोजित केली जाणार आहे. ”
>
> - अभिषेक बारणे, अध्यक्ष – स्थायी समिती, पिंपरी चिंचवड महापालिका.

> “ अनधिकृत बांधकाम धारकांच्या बिलामध्ये शास्ती कराचे समायोजन केले जात आहे. ही रक्कम मोठी असल्यामुळे एका वर्षात समायोजन होऊ शकत नाही. दरवर्षी मालमत्ता धारकांच्या बिलानुसार समायोजन केले जात आहे. २०२६-२७ या आर्थिक वर्षात २२ हजार ९०६ मालमत्ता धारकांच्या रक्कमेचे समायोजन केले जाणार आहे. महापालिकेकडे १६४ कोटी ४१ लाख रूपये समायोजन करणे बाकी आहे. ही रक्कम टप्या-टप्याने दरवर्षी समायोजित केली जात आहे.
>
> - तृप्ती सांडभोर अतिरिक्त आयुक्त पिंपरी चिंचवड महापालिका.

---

# आमदार सुनील शेळके यांच्या पाठपुराव्याला मोठे यश; पवना धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाचा मार्ग मोकळा

## उच्चस्तरीय बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय; धरणग्रस्तांना प्रत्येकी दोन एकर जागा व मूलभूत सुविधांसाठी विशेष निधीची ग्वाही

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ तालुक्यातील पवना धरणग्रस्तांच्या अनेक दशकांपासून प्रलंबित असलेल्या पुनर्वसनाच्या प्रश्नाला अखेर निर्णायक गती मिळाली असून, आमदार सुनील शेळके यांच्या सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि प्रभावी प्रयत्नांना मोठे यश मिळाल्याचे मानले जात आहे. बुधवारी सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल येथे जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील आणि पुनर्वसन मंत्री नामदार मकरंद आबा जाधव (पाटील) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत पवना धरणग्रस्तांच्या हिताचे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.



बैठकीत पवना धरणग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी आवश्यक असलेल्या जागेच्या उपलब्धतेस तत्त्वतः मान्यता देण्यात आली. धरणग्रस्त कुटुंबांना प्रत्येकी दोन एकर क्षेत्र उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक निर्णय झाल्याने अनेक वर्षांपासून रखडलेला पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लागण्याच्या दिशेने मोठे पाऊल पडल्याचे मानले जात आहे.

याचबरोबर पुनर्वसित गावठाणांमध्ये रस्ते, पाणीपुरवठा, वीज तसेच इतर मूलभूत नागरी सुविधा उभारण्यासाठी विशेष बाब म्हणून भरीव निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासनही दोन्ही मंत्र्यांनी दिले. त्यामुळे धरणग्रस्तांना केवळ पुनर्वसन नव्हे, तर सर्व सुविधांनी युक्त सुसज्ज जीवनमान उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

पवना धरणग्रस्तांचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून विविध स्तरांवर प्रलंबित होता. मात्र आमदार सुनील शेळके यांनी हा विषय सातत्याने शासन दरबारी मांडत धरणग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या पुढाकारामुळेच राज्य शासनाच्या सर्वोच्च स्तरावर बैठक होऊन सकारात्मक निर्णयप्रक्रिया सुरू झाल्याचे बोलले जात आहे.

बैठकीनंतर धरणग्रस्तांमध्ये समाधानाचे वातावरण असून,“आमदार सुनील शेळके यांच्या माध्यमातून आमच्या पुनर्वसनाचा प्रश्न आता निश्चित मार्गी लागेल,” असा विश्वास धरणग्रस्त बांधवांकडून व्यक्त करण्यात येत आहे. मावळच्या विकासासाठी आणि धरणग्रस्तांच्या न्यायासाठी घेतलेल्या या पुढाकारामुळे आमदार सुनील शेळके यांच्या नेतृत्वाला आणखी बळ मिळाल्याची चर्चा राजकीय व सामाजिक वर्तुळात सुरू आहे.

दरम्यान, सदर बैठकीस मंत्रालयातील जलसंपदा विभागाचे सचिव, पुनर्वसन विभागाचे सचिव, अवर सचिव, कक्ष अधिकारी, अतिरिक्त जिल्हाधिकारी पुणे, जिल्हा पुनर्वसन अधिकारी पुणे, पवना प्रकल्प अधिकारी तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# महावितरणच्या आकुर्डी प्रकल्पात 25 कोटींचा गैरव्यवहार ?

## वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून नियमबाह्य परवानगी, चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करा, कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनची मागणी





**पिंपरी | प्रतिनिधी**

आकुर्डीतील 11 एकर औद्योगिक प्रकल्पाला वीजपुरवठा देताना महावितरणचे नियम धाब्यावर बसवून 2 कोटी 28 लाख रुपयांची कामे कोणतीही अधिकृत वर्क ऑर्डर नसताना सुरू करण्यात आली. या प्रकरणात महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या संगनमताने 20 ते 25 कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप पिंपरी-चिंचवड इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनचे कार्याध्यक्ष तथा शिवसेना पुणे जिल्हा संघटक मा. श्री. संतोष सौंदणकर यांनी गुरुवारी (ता. 11) प्रसिध्दी माध्यमांसमोर केला. हा गैरव्यवहार जावेद मुजावर यांनी माहितीच्या अधिकारातून उजेडात आणला आहे.

यावेळी पिंपरी-चिंचवड इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनचे कार्याध्यक्ष संतोष सौंदणकर यांच्यासह संघटनेचे अध्यक्ष गिरीश बक्षी, उपाध्यक्ष मनोज हरपळे, जावेद मुजावर, सचिव नितीन बोंडे, खजिनदार विशाल रोकडे, कार्यकारणी सदस्य प्रशांत महाजन, सदस्य महेश माने, अरुण ढाके, तानाजी ससाने, मंगेश सोनकांबळे, प्रदीप पाटील, अरुण बडगुजर, मनोज सचदेव, सुरज बराटे, संजय इंगळे, रजनीकांत कदम, योगेश पवार, संजीव पाटील, सागर चव्हाण, ओम परदेशी, उमेश परदेशी, मनीष शेळके, चंद्रकांत सूर्यवंशी, गणेश गाडे, जितेंद्र राठोड आदी उपस्थित होते.

सौंदणकर म्हणाले की, 3.5 एमव्हीएपेक्षा जास्त विद्युत भार असलेल्या प्रकल्पांसाठी महावितरणकडून किमान 6 गुंठे जागा सबस्टेशनसाठी घेणे बंधनकारक असते. मात्र, संबंधित प्रकल्पाला कोणतीही जागा न घेता नियमबाह्य पद्धतीने कन्स्ट्रक्शन मीटर मंजूर करण्यात आले. याच कारणासाठी इतर अनेक कंत्राटदारांना परवानगी नाकारण्यात आली होती, मात्र या प्रकरणात अधिकाऱ्यांनी विशेष मर्जी दाखवली. आकुर्डीतील एका कंपनीत एनएसएस योजनेअंतर्गत 2 कोटी 28 लाख रुपयांचे काम कोणतीही अधिकृत वर्क ऑर्डर न देता सुरू करण्यात आले आहे. या कामासाठी ग्राहकांकडून सुमारे 19 लाख रुपये सीआरए शुल्क वसूल करण्यात आले आहेत. वास्तवीकतः किमान 24 ते 26 लाख रुपये वसूल करणे अपेक्षित होते. ते न करता संपूर्ण प्रक्रिया नियमबाह्य पद्धतीने राबविण्यात आली आहे. असाच नियम दाखवून भोसरी जे ब्लॉकमध्ये कनेक्शन रोखण्यात आले आहेत.

पिंपरी-चिंचवड इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनचे अध्यक्ष मा. श्री. गिरीश बक्षी म्हणाले, हे काम करण्यासाठी कोणत्याही प्रकारची वर्क ऑर्डर न देता संबंधित कंत्राटदाराला साईटवर आधीच स्विच फिडर पिलर, ट्रान्सफॉर्मर प्लिंथ, जीओडी साहित्य तसेच 22 केव्ही एचटी लाईनचे काम सुरू करण्यास परवानगी दिली. हे काम घाईघाईत पूर्ण करण्याचा खटाटोप सुरु आहे. विशेष म्हणजे इस्टिमेटमध्ये 750 मीटर केबल टाकण्याचे प्रस्तावित असताना प्रत्यक्षात केवळ 250 मीटरच केबल टाकली आहे. त्यासाठी महापालिकेची परवानगी न घेता पदपथावर खोदकाम केले आहे. महापालिकेचे नियम थाब्यावर बसवण्यात आल्याचा आरोप मा. बक्षी यांनी केला आहे.

"महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचा आशीर्वाद नसताना कोणताही कंत्राटदार दीड कोटी रुपयांची गुंतवणूक करू शकत नाही," त्यामुळे महावितरणचे अधीक्षक अभियंता सिंहाजीराव गायकवाड, कार्यकारी अभियंता अतुल देवकर आणि आकुर्डी विभागाचे कार्यकारी अभियंता अशोक जाधव यांची चौकशी करण्याची मागणी मा. सौंदणकर यांनी केली आहे. "सामान्य ग्राहकांसाठी एक नियम आणि निवडकांसाठी दुसरा नियम, अशी महावितरणची भूमिका आहे. रेड झोन, लोड मंजुरी आणि वीजजोडणीसाठी सामान्य नागरिकांना नियम दाखवले जातात; मात्र, काही मोजक्या लोकांसाठी सर्व नियम बाजूला ठेवले जातात," असा आरोप मा. सौंदणकर यांनी केला आहे.

या प्रकरणाची तक्रार मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर तसेच महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक यांच्याकडे करण्यात आली आहे. आठ दिवसांत चौकशी करून दोषींवर कारवाई करावी. "जोपर्यंत संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी होत नाही, तोपर्यंत या कामाला तात्काळ स्थगिती द्यावी," अशी मागणी असोसिएशनचे सचिव नतीन बोंडे यांनी केली. महावितरणच्या कारभारावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण करणाऱ्या या आरोपांमुळे वीज वितरण विभागातील कथित भ्रष्टाचाराचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.

# महाराष्ट्र किकबॉक्सिंग असोसिएशनचे चेअरमन संतोष बारणे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा..

## आमदार महेशदादा लांडगे यांची प्रमुख उपस्थिती; राज्यभरातील खेळाडूंचा उत्स्फूर्त सहभाग



**पिंपरी | प्रतिनिधी**

महाराष्ट्र किकबॉक्सिंग असोसिएशन आणि पिंपरी-चिंचवड किकबॉक्सिंग असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने उद्योजक तथा महाराष्ट्र किकबॉक्सिंग असोसिएशनचे चेअरमन संतोष बारणे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या किकबॉक्सिंग स्पर्धा २०२६ उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेला आमदार महेशदादा लांडगे यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

यावेळी आमदार लांडगे यांनी क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी आणि खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी सातत्याने सकारात्मक भूमिका घेत असल्याचे अधोरेखित झाले. त्यांच्या उपस्थितीमुळे स्पर्धेतील खेळाडू, प्रशिक्षक आणि आयोजकांना मोठी प्रेरणा मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

याप्रसंगी संतोष बारणे म्हणाले की, "आज महाराष्ट्रात सुमारे २५ ते ३० हजार खेळाडू किकबॉक्सिंग या खेळाशी जोडले गेले आहेत. या खेळाच्या विकासासाठी आमदार महेशदादा लांडगे यांनी नेहमीच सकारात्मक भूमिका घेतली असून, भविष्यातही त्यांच्या मार्गदर्शनातून आणि सहकार्याने किकबॉक्सिंगला अधिक बळ मिळेल, याची मला पूर्ण खात्री आहे. राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर या खेळाला अधिक मोठी ओळख मिळवून देण्यासाठी त्यांचे मोलाचे योगदान राहील, असा मला विश्वास आहे.

तसेच महाराष्ट्र किकबॉक्सिंग परिवारावर दाखवलेल्या प्रेम, आपुलकी आणि विश्वासाबद्दल बारणे यांनी आमदार लांडगे यांचे मनःपूर्वक आभार मानले. "चेअरमन म्हणून क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी त्यांच्यासोबत कार्य करण्याची संधी मिळत असल्याचा मला अभिमान आहे," अशा भावना त्यांनी यावेळी व्यक्त केल्या.

स्पर्धेत राज्यातील विविध भागांतील खेळाडूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या कौशल्याचे प्रदर्शन केले. क्रीडाप्रेमी वातावरणात पार पडलेल्या या स्पर्धेमुळे किकबॉक्सिंगच्या प्रसाराला आणि नवोदित खेळाडूंना प्रोत्साहन मिळणार असल्याचा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

# पुण्यात BDP आरक्षणावरून नवा वाद; समितीवर दबाव टाकल्याची चर्चा

## दुप्पट TDR आणि 60 टक्के बांधकाम परवानगीच्या शिफारशीसाठी आग्रही भूमिका; अहवाल अंतिम टप्प्यात

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या जुन्या हद्दीच्या विकास आराखड्यात असलेल्या डोंगर माथा-डोंगर उतारावरील जैवविविधता उद्यान आरक्षणाचा पुनर्विचार करण्यासाठी नेमलेल्या समितीवर महायुतीतील एका बड्या नेत्याने अनुकूल अहवालासाठी दबाव आणल्याचा प्रकार समोर आला आहे. बीडीपी आरक्षित जागांच्या मोबदल्यासाठी दुप्पट टीडीआर आणि ६० टक्के बांधकामास परवानगी देण्याची शिफारस समितीने करावी, अशी आग्रही भूमिका या नेत्याने या समितीपुढे मांडली असल्याचे सांगण्यात येत आहे

पुणे महापालिकेत समाविष्ट २३ गावांसह पुणे महानगर विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील डोंगर माथा-डोंगर उतारावर (हिल टॉप, हिल स्लोप) च्या ९७८ हेक्टर खासगी क्षेत्रावर बीडीपी आरक्षण टाकण्यात आले आहे. या जागांवर बांधकामांना परवानगी न देता मोबदला म्हणून ०.८ इतका टीडीआर देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. मात्र, हा मोबदला अत्यल्प असल्याने बीडीपीसाठी जागा देण्यास जागामालक तयार नाही.




### ९७८ हेक्टर खासगी क्षेत्र बीडीपी आरक्षणाखाली

» पुणे महापालिकेत समाविष्ट २३ गावे आणि पीएमआरडीए हद्दीतील डोंगर माथा-डोंगर उतारावरील सुमारे ९७८ हेक्टर खासगी क्षेत्रावर जैवविविधता उद्यान (बीडीपी) आरक्षण लागू करण्यात आले आहे. या जागांवर बांधकामास बंदी घालून मोबदल्यात ०.८ टीडीआर देण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. मात्र, हा मोबदला अपुरा असल्याचे सांगत अनेक जागामालकांनी त्यास विरोध दर्शविला आहे.

दरम्यान बीडीपी आरक्षण उठवून बांधकामास परवानगी द्यावी, अशी मागणी लोकप्रतिनिधींसह व बीडीग्रस्तांकडून शासनाकडे सातत्याने करण्यात येत होती.

त्यावर राज्य शासनाने बीडीपी आरक्षणाचा पुनर्विचार करून त्यावर निर्णय घेण्यासाठी गतवर्षी माजी निवृत्त आयएएस अधिकारी रमाकांत झा यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे. या समितीच्या बीडीपीग्रस्तांसह विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांशी चर्चा केली आहे. त्यानुसार आता या समितीकडून बीडीपी आरक्षणाबाबत राज्य शासनाला अहवाल पाठविण्याची अंतिम कार्यवाही सुरू आहे.

असे असतानाच महायुती सरकारमधील एका बड्या नेत्याने या तज्ज्ञांच्या समितीवर दबाव आणल्याची बाब समोर आली आहे. बीडीपीच्या आरक्षणाच्या विरोधात असलेल्या या नेत्याने काही दिवसांपूर्वी बीडीपी समिती सदस्यांची बैठक घेतली. या बैठकीत बीडीपीग्रस्तांना थेट जागेचा मोबदला म्हणून दुप्पट टीडीआर व बीडीपी आरक्षित जागांवर ६० टक्के बांधकामांना परवानगी देण्याची शिफारस राज्य शासनाला करावी, असे निर्देश समितीला दिले आहेत. दरम्यान, समितीने मात्र आपण अशा प्रकारची शिफारस करणार नाही, असे स्पष्ट करीत समितीच्या कामकाजात हस्तक्षेप करू नका, असेही या बड्या नेत्याला सुनावले असल्याची चर्चा महापालिका वर्तुळात रंगली आहे.

### समितीवर दबाव आणल्याची चर्चा

» बीडीपी आरक्षणाचा पुनर्विचार करण्यासाठी माजी आयएएस अधिकारी रमाकांत झा यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे. या समितीवर महायुतीतील एका बड्या नेत्याने दबाव आणल्याची चर्चा सध्या महापालिका वर्तुळात रंगली आहे. बीडीपीग्रस्तांना दुप्पट टीडीआर देणे आणि आरक्षित जागांवर ६० टक्के बांधकामास परवानगी देण्याची शिफारस समितीने करावी, अशी भूमिका बैठकीत मांडल्याचे सांगितले जात आहे.

### अहवाल लवकरच शासनाकडे

» समितीने विविध तज्ज्ञ, नागरिक आणि बीडीपीग्रस्तांशी चर्चा करून अहवाल अंतिम टप्प्यात आणला आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, समितीकडून बीडीपी क्षेत्रात १५ ते २० टक्के बांधकामास परवानगी देण्याची शिफारस होण्याची शक्यता आहे. समितीने आपल्या कामकाजात हस्तक्षेप स्वीकारला जाणार नसल्याची भूमिका घेतल्याचीही चर्चा असून, अंतिम अहवाल लवकरच राज्य शासनाकडे सादर केला जाणार आहे.

# पुण्यात स्कूल बसमध्ये CCTV तपासणी मोहीम; 20 जूनपर्यंत माहिती अद्ययावत करण्याचे RTO चे आदेश

## सर्व शाळांना पोर्टलवर बसची तपशीलवार माहिती भरणे बंधनकारक; मुदतीनंतर विशेष पथकांकडून भौतिक तपासणी व कडक कारवाईचा इशारा

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे: पुणे शहर, जिल्ह्यातील सर्व स्कूल बसमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहेत की नाही आणि ते चालू स्थितीत आहेत का, याची थेट भौतिक पाहणी 'आरटीओ' च्या विशेष पथकांद्वारे आता केली जाणार आहे. आपल्या शाळेतील स्कूल बसची संपूर्ण माहिती आरटीओच्या अधिकृत पोर्टलवर अद्ययावत करण्यासाठी २० जून २०२६ ही अंतिम मुदत देण्यात आली आहे, असे आदेश प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड यांनी सर्व शाळा प्रशासनाला दिले आहेत.

महाराष्ट्र स्कूल बस नियमावली २०११ आणि पुणे जिल्हा स्कूल बस सुरक्षितता समितीच्या निर्णयानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. HTTP:///SCHOOLBUSSAFETYPUNE.ORG या आरटीओच्या अधिकृत संकेतस्थळावर शाळा आणि बस व्यवस्थापकांना लॉगिन करून आणि त्यामधील माहिती भरून अद्ययावत करणे अनिवार्य करण्यात आले आहे.




या पोर्टलमध्ये सुरक्षेच्या दृष्टीने काही नवीन रकाने समाविष्ट करण्यात आले असून, त्यामध्ये शाळेच्या मालकीच्या किंवा करारावरील एकूण बसची संख्या, प्रत्येक वैयक्तिक बसमध्ये सीसीटीव्ही कॅमेरा बसवला आहे की नाही आणि तो सध्या सुरू स्थितीत आहे का, याची अचूक माहिती देणे बंधनकारक आहे, असेही आदेश आरटीओ गायकवाड यांनी पत्राद्वारे शाळा प्रशासनाला दिले आहेत.

महाराष्ट्र स्कूल बस नियमावली २०११ आणि पुणे जिल्हा स्कूल बस सुरक्षितता समितीच्यानिर्णयानुसारहानिर्णय घेण्यात आला आहे. HTTP:///SCHOOLBUSSAFETYPUNE.ORG या आरटीओच्या अधिकृत संकेतस्थळावर शाळा आणि बस व्यवस्थापकांना लॉगिन करून आणि त्यामधील माहिती भरून अद्ययावत करणे अनिवार्य करण्यात आले आहे.

### मुदतीनंतर होणार कडक कारवाई

» दि. २० जून २०२६ या मुदतीनंतर आरटीओच्या विशेष पथकांद्वारे प्रत्यक्ष बसची तपासणी करून पोर्टलवरील माहितीची शहानिशा केली जाईल. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई केली जाईल. तांत्रिक अडचणींसाठी शाळांनी पुणे आरटीओ कार्यालयातील वरिष्ठ लिपीक दत्तात्रय गुंजकर (९४२३२६५९५५) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन आरटीओ प्रशासनाने केले आहे.

# पुणे महानगरातील पायाभूत सुविधांसाठी पाच हजार कोटींचा 'बूस्टर'

## 'पुणे ग्रोथ हब' अंतर्गत पुढील 5 वर्षांत तब्बल 5,000 कोटी रुपयांचा विशेष निधी मिळणार आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे ग्रोथ हब आराखडा जिल्ह्याच्या शाश्वत व गतिमान विकासासाठी महत्त्वाचा आहे. त्यामुळे या प्रकल्पांतर्गत पुढील ५ वर्षांत ५ हजार कोटी रुपयांच्या विशेष निधीमधून सुरू करावयाच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांचा प्राधान्यक्रम ठरवून प्रकल्प आराखडा तयार करावा, अशा सूचना विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले यांनी केल्या आहेत.

पुणे जिल्ह्याचा सर्वांगीण विकास आराखडा तयार करण्याच्या अनुषंगाने पुणे ग्रोथ हब अंतर्गत कार्यकारी समितीची बैठक विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीला महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त (पीएमआरडीए) अभिजित चौधरी, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पीएमआरडीएच्या अतिरिक्त आयुक्त के. मंजुलक्ष्मी, पुणे महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, मॅकेन्झी कंपनीचे रौनक शहा आणि पुणे इंटरनॅशनल सेंटरचे (पीआयसी) संचालक दिनानाथ खोलकर उपस्थित होते.



### उद्योग, रोजगार आणि गुंतवणुकीला चालना

» पुणे महानगर प्रदेश माहिती तंत्रज्ञान, वाहननिर्मिती उद्योग, संशोधन संस्था आणि स्टार्टअप परिसंस्थेमुळे देशातील महत्त्वाचे आर्थिक केंद्र बनत आहे. या उपक्रमातून उद्योग, रोजगार आणि गुंतवणूक वाढविण्यास चालना मिळणार असून सकल देशांतर्गत उत्पादनात वाढ करण्याचे उद्दिष्ट आहे. महानगर प्रदेशाच्या आर्थिक क्षमतेचा अधिकाधिक उपयोग करून विकासाला नवी दिशा देण्याचा प्रयत्न या आराखड्यातून केला जाणार आहे.

या बैठकीत पुणे ग्रोथ हब या संकल्पनेअंतर्गत नीती आयोगाला सादर करावयाच्या मसुद्याचे मॅकेन्झी कंपनीकडून सादरीकरण करण्यात आले. यावेळी विभागीय आयुक्तांनी पुणे परिसरातील आर्थिक वाढ, जीवनमान, गुणवत्ता व शाश्वत विकास या प्रमुख बाबी लक्षात घेऊन प्रकल्प आराखडा सादर करण्याची सूचना केली. प्रकल्पांची यादी तयार करताना प्रकल्पांच्या अंमलबजावणीच्या वेळी येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

प्रत्येक प्रकल्पासाठी लागणारा अंदाजित खर्च व कालक्रम ठरवावा, अनेक प्रकल्पांना भूसंपादन आवश्यक आहे. या उपक्रमांतर्गत महानगर प्रदेशांच्या आर्थिक क्षमतेचा उपयोग करून उद्योग, रोजगार व गुंतवणूक वाढीस चालना आदी बाबींचा विचार करून बृहत आराखडा तयार करावा, अशी सूचना श्रावण हर्डीकर यांनी केली.

पुणे महानगर प्रदेश माहिती तंत्रज्ञान, वाहननिर्मिती उद्योग परिसंस्था, संशोधन संस्था, नवउद्यमी (स्टार्टअप) परिसंस्था यामुळे देशातील प्रमुख आर्थिक केंद्र म्हणून विकसित होत आहे. या उपक्रमांतर्गत महानगर क्षेत्राच्या विकासासह सकल देशांतर्गत उत्पादनात वाढ करणे आणि मोठ्या प्रमाणात नोकऱ्या उपलब्ध करून देण्याचे ध्येय आहे, असे अभिजित चौधरी यांनी सांगितले.

### 'पुणे ग्रोथ हब'

» पुणे जिल्ह्याच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासासाठी 'पुणे ग्रोथ हब' हा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत पुढील पाच वर्षांत ५ हजार कोटी रुपयांच्या विशेष निधीतून विविध पायाभूत सुविधा प्रकल्प हाती घेण्यात येणार आहेत. या प्रकल्पांचा प्राधान्यक्रम निश्चित करून सविस्तर आराखडा तयार करण्याच्या सूचना विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले यांनी संबंधित यंत्रणांना दिल्या आहेत.

### प्रकल्प आराखड्यात आर्थिक वाढीवर भर

» पुणे ग्रोथ हब कार्यकारी समितीच्या बैठकीत मॅकेन्झी कंपनीकडून नीती आयोगासाठी तयार करण्यात आलेल्या मसुद्याचे सादरीकरण करण्यात आले. आर्थिक वाढ, जीवनमानाची गुणवत्ता आणि शाश्वत विकास या बाबींना केंद्रस्थानी ठेवून आराखडा तयार करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच प्रकल्पांच्या अंमलबजावणीतील संभाव्य अडचणी, भूसंपादनाची गरज आणि खर्चाचा तपशील यांचाही अभ्यास करण्यावर भर देण्यात आला.

# पुण्यातील विषारी दारू प्रकरणानंतर 188 ग्रामपंचायतींना नोटिसा; गावठी दारू धंद्याची माहिती देण्याची सूचना

## पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसराला हादरवून सोडणाऱ्या विषारी दारू प्रकरणानंतर राज्य उत्पादन शुल्क विभागाने मोठा पाऊल उचलले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील विषारी दारू प्रकरणानंतर राज्य उत्पादन शुल्क विभागाने (एक्साईज) पुणे जिल्ह्यातील ज्या गावात गावठी दारू तयार केली जाते. अशी गावे निश्चित केली आहेत. उत्पादन शुल्क विभागाने जिल्ह्यातील १८८ ग्रामपंचायतीना नोटिसा बजावल्या आहेत. 'गावाच्या परिसरातील बेकायदा गावठी दारू धंदे, दारू तयार करणाऱ्या सराइतांची माहिती उत्पादन शुल्क विभागाला द्यावी', अशा सूचना नोटिशीद्वारे दिल्या आहेत.



'उत्पादन शुल्क विभागाने पुणे शहरालगत असणारी गावे, तसेच जिल्ह्यातील गावांची यादी तयार केली आहे. या गावात बेकायदा गावठी (हातभट्टी) दारू तयार केली जाते. या गावातून शहर परिसरात दारू विक्रीस पाठविली जाते. जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत अशा गावांना नोटिसा पाठविण्यात आल्या आहेत. ग्रामपंचायतींनी त्यांच्या हद्दीत बेकायदा दारू चालून देऊ नये, अशा प्रकारचे गैरप्रकार करणाऱ्यांची माहिती उत्पादन शुल्क विभाग, तसेच पोलिसांनी द्यावी', असे राज्य उत्पादन शुल्क विभागाचे पुणे कार्यालयातील अधीक्षक अतुल कानडे यांनी दिली.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहराजवळ असलेल्या गावात भट्ट्या पेटवून गावठी दारू तयार केली जाते. गावातील निर्जन भाग, तसेच शासकीय जमिनींच्या परिसरातील झाडीत दारूभट्ट्या उभ्या केल्या जातात. या भागात नागरिकांचा फारसा वावर नसतो, असे दिसून आले आहे. पुणे जिल्ह्यातील सोरतापवाडी, कुंजीरवाडी, नांदूर, (पुणे-सोलापूर रस्ता) राजेवाडी, भोसलेवाडी, आपटी (शिरुर) या गावांसह १८८ गावांतील ग्रामपंचायतींना नोटिसा बजाविण्यात आल्या आहे.

### ग्रामस्थांना धमक्या

» 'बेकायदा दारूधंद्याची माहिती पोलिसांना देणाऱ्या नागरिकांना गावठी दारू तयार करणारे सराईत धमकावितात. दारू तयार करणाऱ्या सराइतांना काही 'प्रभावशाली' व्यक्तींचे पाठबळ असते. त्यामुळे नागरिक आणि ग्रामपंतायत सदस्य उघडपणे तक्रार करण्यास घाबरतात', अशी तक्रार पुणे-सोलापूर रस्त्यावर असलेल्या एका गावातील ग्रामपंचायत सदस्याने केली.